# MAHARASHTRA ACT No. LIV OF 1994.

## THE MAHARASHTRA ACQUISITION OF LANDS FOR LOWER PANZRA MEDIUM IRRIGATION PROJECT (VALIDATION) ACT, 1994.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २९ डिसेंबर १९९४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. LIV OF 1994.

## AN ACT TO VALIDATE THE ACQUISITION OF LANDS MADE OR PURPORTING TO HAVE BEEN MADE FOR THE PURPOSES OF LOWER PANZRA MEDIUM IRRIGATION PROJECT IN SAKRI TALUKA OF DHULE DISTRICT.

[राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ३० डिसेंबर १९९४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

## सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४.

**धुळे जिल्ह्याच्या साक्री तालुक्यातील लोअर पांझरा मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रयोजनांसाठी केलेल्या किंवा करण्यात आलेले असल्याचे अभिप्रेत असलेल्या भूमि संपादनाचे विधिग्राह्यीकरण करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ३ ऑक्टोबर १९९४ रोजी महाराष्ट्र लोअर पांझरा
१९९४ चा महा. अध्या. क्र. १५. मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी भूमि संपादन (विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, १९९४ प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र लोअर पांझरा मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी भूमि संपादन (विधिग्राह्यीकरण) अधिनियम, १९९४ असे म्हणावे.

(२) तो दिनांक ३ ऑक्टोबर १९९४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याचे पुनरुज्जीवन व निरसन. २. (१) दिनांक १ जानेवारी १९९० रोजी, महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९७६ याद्वारे, महाराष्ट्र प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींची पुनर्वसाहत अधिनियम, १९८६ यांचे निरसन झाले असले तरीही या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, तो अधिनियम पुनरुज्जीवित, पुनरधिनियमित करण्यात आला असल्याचे व पूर्णपणे अंमलात असल्याचे मानण्यात येईल. १९७६ चा महा. ४१. १९८९ चा महा. ३२.

(२) अशा प्रकारे पुनरुज्जीवित व पुनरधिनियमित करण्यात आलेला अधिनियम त्याच्या कलम ११ अन्वये अधिसूचित केलेल्या प्रकल्पांना पुढील फेरबदलांसह दिनांक २४ सप्टेंबर १९८६ पासून लागू होईल :—

(अ) उक्त अधिनियमाच्या कलम २ मध्ये,—

(एक) खंड (१) ऐवजी, खालील खंड दाखल करण्यात येईल :—

"(१) एखाद्या प्रकल्पाच्या संबंधात "बाधित परिमंडल" म्हणजे, कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांमधील किंवा क्षेत्रांमधील, त्या प्रकल्पाखालील बाधित परिमंडलाच्या क्षेत्रामध्ये समावेश असलेल्या जमिनी ;" ;

(दोन) खंड (३) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(३) एखाद्या प्रकल्पाच्या संबंधात "लाभान्वित परिमंडल" म्हणजे कलम ११ च्या पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या गावांमधील किंवा क्षेत्रांमधील, त्या प्रकल्पाखालील लाभान्वित परिमंडलाच्या क्षेत्रामध्ये समावेश असलेल्या जमिनी ;" ;

(तीन) खंड ८ मध्ये, "कलम १५ अन्वये बाधित परिमंडलामध्ये त्याचा समावेश असल्याचे घोषित केले जाण्याच्या" या मजकुराऐवजी "बाधित परिमंडलामध्ये त्याचा समावेश असल्याचे विनिर्दिष्ट केले जाण्याच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) खंड (११) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(११) 'भूमि संकोष' म्हणजे, ज्यांमध्ये—

(अ) शासकीय पडीत जमिनी ;

(ब) वननिर्मूलनानंतर लागवडीसाठी उपलब्ध असलेल्या किंवा उपलब्ध होऊ शकतील अशा शासकीय वन जमिनी ;

(क) लाभान्वित परिमंडलामध्ये, किंवा कलम १० अन्वये विनिर्दिष्ट करण्यात यावयाच्या कोणत्याही गावामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये ज्यांचा समावेश करता येईल आणि ज्या कलम १६ च्या तरतुदींनुसार भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये संपादन करता येतील, अशा जमिनी ; १८९४ चा १.

(ड) कलम १६ अन्वये संपादन केलेल्या जमिनी ;

(इ) राज्य शासनाकडे विहित असलेली आणि विस्थापित व्यक्तींच्या पुनर्वसाहतीसाठी उपलब्ध असलेली कोणतीही अन्य जमीन,

यांचा समावेश होतो अशा जमिनी ;";

१९७६ महा.

१८९४ चा

१९९४ महा. अ

(ब) कलमे १३, १४ आणि १५ ही वगळण्यात आली असल्याचे मानण्यात येईल ;

(क) उक्त अधिनियमाच्या कलम १९ मधील पोट-कलम (१) मध्ये, "कलम १३ अन्वये" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "नोटीस प्रसिद्ध करील" या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"**राजपत्रात** आणि तसेच कलम ११, पोट-कलम (२) अन्वये तरतूद करण्यात आलेल्या रीतीने एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करील";

(ड) उक्त अधिनियमाच्या कलम २० मध्ये, पोट-कलम (१) मधील "आणि कलम १३ अन्वये करण्यात आलेल्या जमिनीच्या आकारणीच्या आधारे" हा मजकूर वगळण्यात येईल ;

१९७६ चा महा. ४१. १९८९ चा महा. ३२.

(३) अशा प्रकारे पुनरुज्जीवित व पुनरधिनियमित झालेला व पूर्वोक्तानुसार सुधारणा करण्यात आलेला उक्त अधिनियम दिनांक १ जानेवारी १९९० रोजी निरसित करण्यात येईल व निरसित करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

१९७६ चा महा. ४१.

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम १६ अन्वये केलेल्या भूमि संपादनाचे विधिग्राह्यीकरण.

३. महाराष्ट्र प्रकल्पामुळे, विस्थापित झालेल्या व्यक्तींची पुनर्वसाहत अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश "जुना अधिनियम" असा करण्यात आला आहे) हा या अधिनियमाद्वारे, पुनरुज्जीवित, पुनरधिनियमित होऊन, त्यात सुधारणा होण्यापूर्वी व त्याचे निरसन होण्यापूर्वी त्यात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) धुळे जिल्ह्याच्या साक्री तालुक्यातील लोअर पांझरा मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रयोजनांसाठी, दिनांक २४ सप्टेंबर १९८६ रोजी सुरू होणाऱ्या व दिनांक ३१ डिसेंबर १९८९ रोजी संपणाऱ्या मुदतीत जुन्या अधिनियमान्वये करण्यात आलेले किंवा करण्यात आलेले असल्याचे अभिप्रेत असलेले प्रत्येक भूमि संपादन किंवा जमिनीतील किंवा जमिनीवरील हक्कांचे संपादन आणि अशा संपादनाच्या संबंधात केलेली कोणतीही कार्यवाही किंवा केलेली कोणतीही कृती (काढण्यात आलेला कोणताही आदेश, करण्यात आलेला करार किंवा प्रसिद्ध करण्यात आलेली कोणतीही सूचना किंवा अधिसूचना यासह), ही वैध व कायद्यानुसार परिणामकारक असेल व ती नेहमीच वैध व कायद्यानुसार परिणामकारक असल्याचे मानण्यात येईल ; व जुन्या अधि-

१८९४ चा १.

नियमाच्या कलम १६ च्या व भूमि संपादन अधिनियम, १९८४ याच्या तरतुदींनुसार, उक्त पाटबंधारे प्रकल्पाच्या प्रयोजनार्थ केलेल्या भूमि संपादनाच्या संबंधात कोणतीही अधिसूचना प्रसिद्ध करण्याआधी, जुना अधिनियम या अधिनियमाद्वारे पुनरुज्जीवित, पुनरधिनियमित, सुधारित व निरसित केला जाण्यापूर्वी त्याची कलमे १३, १४ व १५ यांच्या तरतुदींचे अंशत: किंवा पूर्णपणे अनुपालन करण्यात आले नव्हते एवढ्याच केवळ कारणावरून, अशा प्रकारे केलेले कोणतेही संपादन, केलेली कोणतीही कार्यवाही किंवा केलेली कोणतीही कृती यांना कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेण्यात येणार नाही किंवा ती अवैध असल्याचे किंवा केव्हाही अवैध झालेली असल्याचे मानण्यात येणार नाही ;

(ब) खंड (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कारणावरून कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा न्यायालयीन कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही किंवा चालविण्यात येणार नाही.

१९९४ चा महा. अध्या. १५.

सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ याचे निरसन.

४. महाराष्ट्र लोअर पांझरा मध्यम पाटबंधारे प्रकल्पासाठी भूमि संपादन (विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, १९९४, हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(यथार्थ अनुवाद)

**ष. श. पाटील,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.